# 'शक्तीपीठ' म्हणजे काय? 'साडेतीन' आकड्याचं नेमकं काय आहे रहस्य?

भारतभूमी ही मंदिरांची आणि देवस्थानांची भूमी आहे. या भूमीत अनेक धार्मिक स्थळे आहेत, पण महाराष्ट्रातील साडेतीन शक्तीपीठांना एक विशेष महत्त्व आहे. ही शक्तीपीठे, तुळजापूरची तुळजाभवानी, कोल्हापूरची महालक्ष्मी, माहूरची रेणुकामाता, आणि वणीची सप्तशृंगी देवी या चार प्रमुख मंदिरांचा समूह आहे. या मंदिरांना 'शक्तीपीठे' का म्हणतात, यामागे एक प्राचीन पौराणिक कथा आहे, जी देवी सतीच्या आत्मदाह आणि भगवान शंकराच्या तांडवाशी संबंधित आहे.



साडेतीन शक्तीपीठे ही देवी सतीची विविध अंगं पडलेल्या जागांवर स्थापित झाल्याचे मानले जाते. या कथांनुसार, राजा दक्षने आयोजित केलेल्या यज्ञात भगवान शंकराचा अपमान केला, त्यामुळे संतप्त होऊन देवी सतीने यज्ञकुंडात उडी मारून आत्मदाह केला. यामुळे भगवान शंकर क्रोधित झाले आणि त्यांनी सतीचा देह खांद्यावर घेऊन तांडव नृत्य सुरू केले. भगवान शंकराचा क्रोध शांत करण्यासाठी भगवान विष्णूंनी सुदर्शन चक्राने सतीचे देह छिन्न-विच्छिन्न केले. सतीची जी अंगं पृथ्वीवर पडली, तीच ही शक्तीपीठे म्हणून ओळखली जातात. यापैकी तीन पूर्ण शक्तीपीठे आणि एक अर्ध शक्तीपीठ आहे. म्हणूनच त्यांना साडेतीन शक्तीपीठे असे म्हणतात.

तीन पूर्ण शक्तीपीठे- तुळजापूरची तुळजाभवानी (उस्मानाबाद): तुळजाभवानी ही महाराष्ट्राची कुलस्वामिनी म्हणून ओळखली जाते. तुळजाभवानी मंदिराच्या निर्मितीमागे एक रोचक कथा आहे. असे मानले जाते की, देवीने छत्रपती शिवाजी महाराजांना तलवार दिली होती, ज्याचा वापर त्यांनी स्वराज्यासाठी केला. तुळजाभवानी ही भवानी मातेचा अवतार आहे आणि ती महाराष्ट्रातील सर्वात प्राचीन शक्तीपीठांपैकी एक आहे. येथे देवीचे दर्शन घेण्यासाठी दरवर्षी लाखो भाविक येतात.

कोल्हापूरची महालक्ष्मी (अंबाबाई): कोल्हापूरची अंबाबाई मंदिर हे पश्चिम महाराष्ट्रातील एक महत्त्वाचे धार्मिक स्थळ आहे. महालक्ष्मीला 'करवीर निवासिनी' असेही म्हणतात. या मंदिराची कलात्मक रचना आणि मूर्ती अतिशय आकर्षक आहेत. महालक्ष्मी हे मंदिर लक्ष्मी आणि विष्णू यांच्यातील संबंधांसाठी ओळखले जाते.

माहूरची रेणुकामाता (नांदेड): माहूरची रेणुकामाता मंदिर हे परशुरामाची आई रेणुका यांच्याशी संबंधित आहे. येथे आई रेणुकाचे दर्शन घेण्यासाठी भाविकांची गर्दी होते. या मंदिराला 'शक्तिपीठ' म्हणून ओळखले जाते, कारण येथे देवी सतीचा उजवा हात पडल्याचे मानले जाते.

अर्ध शक्तीपीठ: वणीची सप्तशृंगी देवी

नाशिक जिल्ह्यातील वणी गावातील सप्तशृंगी मंदिर हे अर्ध शक्तीपीठ आहे. या मंदिराला 'अर्ध' शक्तीपीठ मानण्याचे कारण असे की, येथे देवी सतीचे फक्त अर्धे अंग पडल्याचे मानले जाते. या मंदिराच्या परिसरात सात शिखरे आहेत, म्हणून या देवीला 'सप्तशृंगी' असे म्हणतात. सप्तशृंगी देवी हे स्थान देवीच्या विशेष कृपा आणि चमत्कारांसाठी ओळखले जाते.

महाराष्ट्रातील सांस्कृतिक आणि सामाजिक महत्त्व

साडेतीन शक्तीपीठे ही केवळ धार्मिक स्थळे नाहीत, तर ती महाराष्ट्राच्या समृद्ध सांस्कृतिक वारशाचा भाग आहेत. या मंदिरांमुळे महाराष्ट्रात धार्मिक पर्यटन वाढले आहे, ज्यामुळे स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळाली आहे. ही मंदिरे विविध सणांसाठी, विशेषतः नवरात्रीच्या काळात, भाविकांचे केंद्र बनतात. नवरात्रीच्या नऊ दिवसांत येथे भव्य उत्सव साजरा केला जातो.

महाराष्ट्रातील साडेतीन शक्तीपीठे ही केवळ देवीची मंदिरे नसून, ती महाराष्ट्राच्या लोकांची श्रद्धा, संस्कृती, आणि इतिहासाचे प्रतीक आहेत. या मंदिरांच्या दर्शनाने भाविकांना केवळ आध्यात्मिक समाधानच मिळत नाही, तर ते महाराष्ट्राच्या समृद्ध संस्कृतीचा अनुभव घेतात. ही मंदिरे एक शक्तिशाली ऊर्जा आणि सकारात्मकता घेऊन येतात, ज्यामुळे लोकांना जीवनात नवी प्रेरणा मिळते. या स्थळांचे संरक्षण आणि संवर्धन करणे हे आपल्या सर्वांचे कर्तव्य आहे, जेणेकरून भावी पिढ्यांनाही या समृद्ध वारशाचा लाभ घेता येईल.

◆ पान १ वरून पुढे...

## बीड जिल्ह्यात...

दुसरीकडे, परभणीच्या लोअर दुधना प्रकल्पातून पाण्याचा विसर्ग सुरू असल्याने मानवत तालुक्यातील टाकळी नीलवर्ण गावच्या संपर्क पुन्हा एकदा तुटला आहे. गावाला जोडणारा पूल हा लहान आणि अरुंद असल्याने या पुलावरून मोठ्या प्रमाणावर पाणी वाहत आहे.ज्यामुळे गावकऱ्यांना गावाबाहेर जाता येत नसल्याने गावातच अडकून पडावे लागत आहे. सलग ८ दिवस गावकरी गावातच अडकून आहेत. बीड मधील आष्टी, शिरूर कासार, परळी, अंबाजोगाई तालुक्यासह अन्य तालुक्यात मागील काही दिवसात ढगफुटी आणि अतिवृष्टी झाली होती. यामुळे शेतकऱ्यांच्या शेतातील पिकांसह जिवीत आणि मालमत्तेचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. यासह अनेकांचे संसार उघड्यावर आले होते. याच सर्व नुकसानीचा आढावा मंत्री पंकजा मुंडे जिल्हाधिकारी कार्यालयातील बैठकीत प्रशासनाकडून घेणार आहेत. गेल्या आठवड्याभरापासून राज्यातील बहुतांश भागात पावसाने कहर केल्याचे चित्र आहे. सध्या जरी पावसाचा जोर कमी झाला असला तरी या अतिवृष्टीच्या नुकसानीची दाहकता आता समोर येत आहे. अशातच बीड जिल्ह्यात अतिवृष्टीमुळे झालेल्या नुकसानीचा आढावा मंत्री पंकजा मुंडे आज घेणार आहेत. यासाठी आज जिल्हाधिकारी कार्यालयात बैठकीच्या आयोजन करण्यात आले आहे. बीडचे जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन आणि जिल्ह्यातील संबंधित सर्व अधिकाऱ्यांची उपस्थिती या बैठकीला असणार आहे.

## तीन अपघातात...

अवघड घाटात वाहन चालवताना अनेक अडचणीचा सामना करावा लागतो. धारूर घाटात २२ सप्टेंबर मंगळवार रोजी सकाळी अकरा वाजता टेम्पो व दोन चाकी वाहनात धडक होऊन दोन चाकी वाहणावरील एकाचा जागीच मृत्यू तर दुसरा जखमी झालेला आहे. धारूर घाट अनेक वर्षापासून वाहतूक साठी अडचणीचा बनला आहे. घाटातील अडचणी सोडवण्यासाठी प्रशासन लोकप्रतिनिधी यांना लेखी, तोंडी ,वृत्तपत्र मध्ये अनेक वृत्त छापूनही घाटाचा प्रश्न मार्गी लागत नाही. मागील काही दिवसाखाली घाटातील कामासाठी करोडो रुपये मंजूर झाले पण प्रत्यक्षात कामाला सुरुवात कसलीच झाली नाही. त्यामुळे आणखी किती वर्षे लागतील याची शाश्वती देता येत नाही. यामध्ये वाहन चालक प्रवासी जीव धोक्यात घालून या घाटातून प्रवास करत आहेत. २२ सप्टेंबर मंगळवार रोजी सकाळी अकरा वाजता धारूर तालुक्यातील कोळपिंपरी येथील जाधव यांचा टेम्पो माजलगाव कडे जात असताना व त्याच वेळेत धारूर तालुक्यातील मुंगी येथील दोन चाकी वाहन घाटातून धारूरकडे येत असताना यात धडक होऊन तालुक्यातील मुंगी येथील मुंजाभाऊ धर्मराज सोळुंके यांचा जागीच मृत्यू झाला तर याच दोन चाकी वाहनावरील रमेश मोरे हे जखमी झाले. त्यांना रुगणवाहिकेमध्ये धारूर येथील ग्रामीण रुग्णालयात आणून प्राथमिक उपचार करून पुढील उपचारासाठी अंबाजोगाई येथील स्वामी रामानंद तीर्थ येथे रुग्णालयामध्ये पाठवण्यात आले.दुसरा अपघात : नवरात्र महोत्सवात आज घटस्थापना होत असून तुळजापूर येथून ज्योत घेऊन येणाऱ्या भ३तास भरधाव वेगात जाणाऱ्या ट्रकने चिरडले. यात

◆ पान १ वरून पुढे...

सदरील भ३ताचा जागीच मृत्यू झाला. याच वाहनाने पुढे काही अंतरावर आणखी एका मोटारसायकल चालकाला जोराची धडक दिल्याने तोही जागीच ठार झाला. सदरचा अपघात रात्री साडेबारा वाजण्याच्या सुमारास मांजरसुंबा - पाटोदा रस्त्यावरील मुळुक या गावाजवळ घडला. आजपासून नवरात्र महोत्सव सुरु होत असून घटस्थापना आज होणार आहे. त्याअनुषंगाने बीड जिल्ह्यातून मोठ्या प्रमाणावर तुळजाभवानीचे भक्त तुळजापूर येथून ज्योत घेऊन येतात. शिरूर तालुक्यातील उकलवाडी येथील मुरलीधर आश्रुबा जगदाळे हेही रात्री तुळजापूर येथून ज्योत घेऊन येत होते. ते मांजरसुंबा-पाटोदा रस्त्याने पुढे जात असताना एका ट्रकने त्यांना उडवले. त्यांचा जागीच मृत्यू झाला. पुढे हा ट्रक भरधाव वेगात जात असताना एका मोटारसायकलला त्याने जोराची धडक दिली. या धडकेत सोमनाथवाडी येथील २७ वर्षीय अमोल शेषेराव शेळके याचा जागीच मृत्यू झाला. हा अपघात रात्री साडेबारा वाजण्याच्या सुमारास उकलवाडी येथे घडला. तिसरा अपघात: गेवराई तालुक्यातील खळेगाव येथील युवक दरवर्षी प्रमाणे यंदाही तुळजाभवानी देवीची ज्योत तुळजापूर ते खळेगाव पायी आणतात. पण या वर्षी काळाने घाला घातला अचानक रामेश्वर बाबासाहेब नरवडे वय ५४ धंदा शेती यांना दि.२० सप्टेंबर २०२५ रोजी रात्रीच्या सुमारास येडेश्वरी फाटा उड्डाणपूल जवळपास धाराशिव समोर बार्शी नाका धाराशिव येथे भरधाव येणाऱ्या आयशर टेम्पोने उडवले. सोबतच्या मित्रानी त्यांना वाशी येथील सरकारी रुग्णालयात दाखल केले प्रकृती गंभीर असल्यामुळे तिथून पुढे धाराशिव येथील रुग्णालयात त्यांना हलवण्यात आले. पण डॉक्टरने जागीच मृत असल्याचे घोषित केले. धाराशिव पोलिस ठाण्यात तक्रार दाखल केली आहे. दरम्यान खळेगाव मध्ये शोककळा पसरली आहे. दरम्यान दु...खद वातावरणात दि.२१ सप्टेंबर रोजी अत्यं संस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात आई मुलगा पत्नी असा छोटा परिवार असून नरवडे कुटुंबासह खळेगाव वर शोककुळा पसरली आहे. दरम्यान सध्या नवरात्र उत्सव सुरू होणार असून तुळजापूर असो, मोहोटादेवी असो किंवा रेणुका आई येथील देवीच्या ठिकाणी मंदिराहून गावागावातील युवक कार्यकर्ते ज्योत आणण्यासाठी पायी जातात. अपघाताच्या घटना घडतात.तरी सर्व भक्तांनी रस्त्यावरून पायी जयोत आणताना सुरक्षित काळजी घ्यावी. आणि काळजीपूर्वक प्रवास करावा असेही आव्हान चकलांबा पोलीस स्टेशन यांच्याकडून करण्यात आले आहे.

## आ.संदीप क्षीरसागर...

करण्यासाठी घटनास्थळी उभे राहून बीड नगरपालिकेच्या यंत्रणेकडून प्रत्यक्षात काम करून घेतले. बीड मतदार संघातील साक्षाळपिंपरी येथील सिंदफणा नदीला मोठा पूर आला होता. संदीप भैय्यांनी त्याठिकाणी जाऊन गावातील ग्रामस्थांशी संवाद साधत त्यांना धीर देऊन या अतिवृष्टीच्या काळात कोणताही धोकादायक प्रवास न करण्याचे आवाहन केले. शिरापूर गात या ठिकाणी देखील अतिवृष्टी झाल्याने पूर आला होता. या पुरात काही नागरिक अडकले होते. याची माहिती मिळताच संदीप क्षीरसागर यांनी तात्काळ घटनास्थळी जाऊन आपत्ती निवारण विभागाच्या मदतीने पुरात अडकलेल्या सर्व नागरिकांना सुरक्षित स्थळी स्थलांतर केले. या आपत्तीमध्ये जीवितहानी टाळण्यासाठी प्रशासन व कार्यकर्त्ये अहोरात्र प्रयत्न करत

◆ पान १ वरून पुढे...

आहेत.संकटाच्या काळात धीर सोडू नका मी आपल्या सोबत असल्याचे आ.संदीप क्षीरसागर यांनी नागरिकांना धीर दिला.

### घटनास्थळावरून उपमुख्यमंत्री अजित पवारांना तातडीने केला संपर्क

या सर्व परिस्थितीची गंभीरता पाहून राज्याचे उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याचे पालकमंत्री अजित दादा पवार यांना संदीप क्षीरसागर यांनी तातडीने संपर्क करून परिस्थितीबद्दल माहिती देत आपत्ती व्यवस्थापनाकडून मदत देण्याची विनंती केली. अजित दादांनी पण परिस्थितीचे गांभीर्य समजून बीडच्या जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांना आदेश देऊन व्यवस्थापनाची टीम उपलब्ध करून दिली.

### संदीप भैय्यांमुळे आईसह एका लहान बाळाचे सुरक्षितस्थळी स्थलांतर

बीड मतदार संघातील शिरापूर गात येथे पुराच्या पाण्यात काही नागरिक अडकले होते. त्यामध्ये एका महिलेसह लहान बाळ अडकल्याची माहिती मिळताच आ.संदीप क्षीरसागर हे तात्काळ घटनास्थळी पोहचले. त्यांनी आपत्ती निवारण विभागाच्या मदतीने सर्व नागरिकांसह पुरात अडकलेल्या एक महिलेसह तिच्या लहान बाळाला सुरक्षित ठिकाणी स्थलांतरित केले.

## मराठवाड्यात जलप्रलय!...

प्रमाणात नुकसान झाले आहे. या पावसामुळे एकूण ७२ जनावरे दगावली आहेत. यामध्ये सर्वाधिक २१ जनावरे धाराशिव जिल्ह्यात, तर १६ जनावरे बीड जिल्ह्यात दगावली आहेत. छत्रपती संभाजीनगरमध्ये ५, जालनामध्ये १२, परभणीत ३, हिंगोलीत ६ आणि नांदेड व लातूरमध्ये प्रत्येकी ३ व ६ जनावरांचा मृत्यू झाला आहे. अतिवृष्टीमुळे अनेक ठिकाणी सार्वजनिक मालमत्तेचेही नुकसान झाले आहे. पुरामुळे ६ रस्ते आणि ५ पुलांचे नुकसान झाले आहे. तसेच ४ तलाव फुटले असून, ७६ कच्ची-पक्की घरे कोसळली आहेत. छत्रपती संभाजीनगरमधील एका शाळेचेही नुकसान झाले आहे. पावसामुळे अनेक गावांचा संपर्क तुटला असून, यामध्ये छत्रपती संभाजीनगर, जालना, बीड आणि धाराशिव जिल्ह्यातील गावांचा समावेश आहे. बीड जिल्ह्यातील ७० नागरिकांना सुरक्षित स्थळी हलवण्यात आले आहे. पुराच्या पाण्यात अडकलेल्या २२८ नागरिकांना बाहेर काढण्यासाठी बचाव पथके कार्यरत आहेत. जालना येथे अग्निशमन विभाग, बीडमध्ये नगरपरिषद पथक, तर धाराशिवमध्ये महसूल आणि लष्करी पथके कार्यरत आहेत. बीड जिल्ह्यात एनडीआरएफ पथकाची मागणी करण्यात आली आहे. धाराशिव जिल्ह्यातील परंडा तालुक्यामध्ये पुरात अडकलेल्या २७ व्यक्तींना हेलिकॉप्टरच्या मदतीने सुरक्षित बाहेर काढण्यात यश आले आहे.

## गेवराई बाजार...

पवळ हे उपस्थित होते. उपस्थित मान्यवरांच्या हस्ते नवनिर्वाचित सभापती जगन्नाथ काळे आणि उपसभापती श्रीहरी पवार यांचा सत्कार करण्यात आला.

◆ पान १ वरून पुढे...

सर्वांना विश्वासात घेऊन निर्णय घेतला : अमरसिंह पंडित

ग्रामीण भागाण चांगल्या प्रकारे काम करणाऱ्या आणि सर्व सामान्य तसेच विविध जाती धर्मातील कार्यकर्त्यांला पदावर विराजमान करुन सन्मान करण्याची आपली भुमिका आहे, आणि त्यात कसलाही किंतू परंतु नाही. सर्वांना विश्वासात घेऊन आपण ही निवड केली आहे. गेवराई कृषी उत्पन्न बाजार समिती ही मानाची संस्था आहे. एक रुपयाचेही कर्ज आपल्या बाजार समितीवर नाही. शेतीसाठी खुप कामे करायचे आहे. बाजार समितीत कोल्ड स्टोरेज सुरु करायचे आहे. शेतीची वारंवार चर्चा होण्यासाठी एक नवे दालन सुरु करणार आहोत. राजकीय चर्चेशिवाय शेती मातीची आणि शेतकरी हिताची चर्चा व्हावी हीच आली भुमिका आहे. आपण जर प्रामाणिकणे काम केले तर विधानसभा निवडणुकीत मतदारांनी टाकलेल्या विश्वास आपण सार्थ करु. पाऊस आणि पुरग्रस्त परिस्थितीमुळे शेतकऱ्यांची अवस्था बिकट झाली आहे. आता भेदभाव करायचा नाही. अडचणीतल्या प्रत्येक व्यक्तीला आपल्याला मदत करायची आहे. सर्व शेतकऱ्यांची झालेली नुकसान भरपाई मिळवून देण्यासाठी आपण प्रयत्नशील आहोत असे सांगून कुणीही धिर सोडू नये असे आवाहन त्यांनी यावेळी केले.

सर्व समाजघटकांना न्याय देण्याचा प्रयत्न शिवछत्र परिवार करत आहे : आ. विजयसिंह पंडित

याप्रसंगी बोलताना आ. विजयसिंह पंडित म्हणाले की, सर्व संस्थांमध्ये शिवछत्र परिवाराने सर्व समाजघटकांना न्याय देण्याचा कायम प्रयत्न केला आहे. गेवराई विधानसभा मतदारसंघाचे नेतृत्व आपल्याकडे आहे, आपली जबाबदारी वाढली आहे. बाजार समितीच्या माध्यमातून शेतकरी शेतमजूर यांना दिलासा आणि आधार देण्याचे काम करायचे आहे. जाती जाती जातीमध्ये तेढ निर्माण करुन शिवछत्र परिवाराला बदनाम करण्याचे काम कांहीं लोक करत आहेत, त्यांचा कुटील डाव हानून पाडावा असे आवाहन त्यांनी यावेळी केले

मी सभापती झालो, यावर विश्वास बसत नाही : जगन्नाथ काळे

याप्रसंगी बोलताना नवनिर्वाचित सभापती जगन्नाथ काळे म्हणाले की, आज मी सभापती झालो यावर विश्वास बसत नाही. आमचे नेते अमरसिंह पंडित यांनी टाकलेला विश्वास आपण सार्थ करु असेही ते यावेळी म्हणाले.

उपकार कधीही विसरणार नाही : उपसभापती श्रीहरी पवार

माजी आमदार अमरसिंह पंडित आणि विद्यमान आमदार विजयसिंह पंडित यांच्या मार्गदर्शनाखाली आपण प्रामाणिक आणि निष्ठेने काम करु. माझ्यासारख्या सामान्य माणसालाला शिवछत्र परिवाराने सर्वात मोठ्या पदावर बसवले. शिवछत्र परिवाराचे उपकार आपण कधीच विसरणार नाही असेही ते यावेळी म्हणाले. यावेळी माजी सभापती मुजिब पठाण यांनीही मनोगत व्यक्त केला. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माधव चाटे यांनी केले. यावेळी बाजार समितीचे संचालक अशोक नाईकवाडे, पांडुरंग मुळे, रामलाल धस, हनुमान कोकणे, महारुद्र चाळक, बाबासाहेब जाधव, रमेश साखरे, अशोक खरात, रमेश खोपडे, मंगेश कांबळे, दिलीपकुमार जैन, राम चाळक, कृष्णा राऊत, सौ.वैशाली जाधव यांच्यासह राष्ट्रवादी काँग्रेसचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

◆ पान ४ वरून पुढे...

## अतिवृष्टीने झालेल्या...

करणार आहे. शेतकऱ्यावर ओढवलेली ही संकटाची वेळ असुन, त्यामुळे कोणताही शेतकरी किंवा नागरिक मदतीपासून वंचित राहू नये याची प्रशासनाने काळजी घ्यावी. शेतकरी व सामान्य नागरिकांवर आलेल्या संकटाची तीव्रता लक्षात घेवून तातडीने पंचनामे करून मदत पोहोचविण्यात यावी, असेही त्या म्हणाल्या. जिथे गाळ साचला असेल, पूल वाहून गेला असेल किंवा पाणंद रस्ते, धोकादायक इमारती, ग्रामीण रस्ते यांच्या पुनर्वसनासाठी संबंधितांनी पंचनामे करुन तात्काळ अहवाल सादर करावा. हा अहवाल मंत्रीमंडळाच्या बैठकीत सादर करुन, यासाठी लवकरात लवकर निधी उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न करणार असल्याचे ही श्रीमती मुंडे यावेळी म्हणाल्या. जिल्हाधिकारी व त्यांच्या टीमने परिस्थितीचे गांभिर्य ओळखून तसेच संकटाचा सामना करून, अतिवृष्टीतील परिस्थिती आटोक्यात आणली. तसेच सर्वसामान्य नागरिक आणि शेतकऱ्यांना वेळेत मदत पोहचविली त्याबद्दल जिल्हाधिकारी व त्यांच्या टीमचे श्रीमती मुंडे यांनी अभिनंदन करून समाधान व्यक्त केले. जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन यांनी सादरीकरणांद्वारे अतिवृष्टीत प्रभावित झालेल्या गावांची संख्या, बाधित शेतपिकांचे क्षेत्रफळ, पूर्णपणे व अंशतः नुकसानग्रस्त घरे, रस्ते, विद्यूत पोल यांचे झालेले नुकसान, जलस्रोत व पायाभूत सुविधावर झालेला परिणाम, घरे पूर्णपणे कोसळल्याने बाधित कुटूंबांसाठी तात्पुरती केलेली निवासाची सोय तसेच पुरात वाहून गेलेल्या नागरिकांची तसेच जनावरांची सविस्तर माहिती सादर केली.

## बीड जिल्ह्यात...

ठिकाणी घरांची पडझड तर काही भागात शेतजमिनी वाहून गेल्याची उदाहरणे दिसून येत आहेत. शेतकऱ्यांचे कर्जफेडीचे संकट अधिकच गहिरे झाले असून आगामी रब्बी हंगामासाठी पेरणी करण्याची देखील भीती शेतकऱ्यांमध्ये निर्माण झाली आहे. या पार्श्वभूमीवर शेतकरी बांधवांनी सरकारला विनंती केली आहे की, जिल्ह्यातील नुकसानीचे पंचनामे तात्काळ पूर्ण करून शेतकऱ्यांना थेट मदत पोहोचवावी. केवळ निवडक शेतकऱ्यांनाच मदत देण्यापेक्षा सर्वसामान्य शेतकरी बांधवांपर्यंत मदत पोहोचली पाहिजे

◆ पान ४ वरून पुढे...

अशी मागणी करुन ड. सुरेशराव हात्ते यांनी शेतकऱ्यांच्या या मागणीला आता सरकारने पाठबळ द्यावं. शासनाने तातडीने ओला दुष्काळ घोषित करून मदत कार्यवाही सुरु करावी, अशी मागणी केली आहे.

## माजलगाव शहरात...

चांदीचा तांब्या, १०० ग्राम वजनाचे चांदीच्या वाट्या, १८० ग्राम वजनाचे ९ चांदीचे शिं , ४०० ग्राम वजनाचा चांदीचा वळा, ६० ग्राम वजनाचा चांदीचा पांचपाळा व इतर साहित्य व नगदी २५००० रु. असा आजच्या बाजार भावा प्रमाणे अंदाजे १२-१५ लाख रु. चा एवज चोरांनी लंपास केला असल्याची फिर्याद दिली आहे.या प्रकरणी शहर पोलिसात ३४०/२०२५ गुन्हा नोंद क्रमांक भारतीय न्याय संहिता ३३१(४), ३०५ अ नुसार जबरी चोरीचा गुन्हा दाखल झाला असून पुढील तपास पी. एस. आय. केरबा माकणे हे करत आहे.

## शेतातील पाणी काढून...

शोककळा पसरली आहे. तालुक्यातील कऱ्हेवाडी येथील शेतकरी बाळासाहेब आश्रुबा सांगळे मुकादम (वय ४० )दि. २० रोजी सकाळच्या सुमारास शेतातील साचलेले पाणी काढून देण्यासाठी गेले होते. ते लवकर घरी परत आले नाही कुटुंबीयांनी त्यांची शोधाशोध असता शेतात त्यांचा मृतदेह आढळून आला. त्याचठिकाणी शेजारी वीज वाहक तार तुटून जमिनीवर पडली होती. या तारेला स्पर्श झाल्यानेच त्यांचा मृत्यू झाल्याची माहिती ग्रामस्थांनी व आष्टी पोलिसांनी दिली.आष्टी ग्रामीण रुग्णालयात शवविच्छेदन करून दुपारी गावी शेतात शोकाकुल वातावरणात अंत्यसंस्कार करण्यात आले यावेळी राजकीय, सामाजिक, शैक्षणिक, धार्मिक, क्षेत्रातील नागरीक मोठ्या संख्येने उपस्थित होते.त्यांच्या पश्चात पत्नी,एक मुलगा दोन मुली असा परिवार आहे.घटनास्थळी भेट देऊन पोलिस बब्रुवाण वाणी, गणेश जगताप, पो.ह.विकास जाधव यांनी पंचनामा केला आहे.आष्टी पोलिस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे.

## प्रचंड पावसाने...

हवालदिल झाला असून त्यांना तात्काळ मदत मिळणे गरजेचे आहे पण

◆ पान ४ वरून पुढे...

प्रशासन कागदी घोडे नाचविण्यात व्यस्त आहे महायुती सरकारने तात्काळ शेतकऱ्यांना सरसकट मदत देऊन बीड जिल्ह्यात ओला दुष्काळ जाहीर करावा नसता शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष तीव्र स्वरूपाचे आंदोलन करेल असा इशारा जिल्हा प्रमुख उल्हास गिराम यांनी दिला आहे

## दिंडी वस्तीवर...

बाहेर काढायचे, असा प्रश्न पडला आहे. तहसीलदार शेळके यांनी सदरील परिस्थितीची माहिती जिल्हाधिकाऱ्यांना दिली आहे. दरम्यान, सोमवार ता. २२ रोजी सायंकाळपर्यंत गाव आणि वस्तीवर अडकलेल्या नागरीकांच्या जिवाला धोका निर्माण झाला असून, रात्र झाल्याने चिंता व्यक्त करण्यात येत आहे. बाळराजे पवार यांनी रात्री आठ वाजता दोन्ही ठिकाणी भेटी देऊन नागरिकांना धीर दिला.

## राजकीय नेत्यांच्या...

पाहणी करुन त्यामधील नेत्याचा सविस्तर जबाब पोनि श्री राऊत साहेब यांनी घेतला असता सदर जबाब मध्ये राजकीय नेत्याच्या वाढदिवसाचे कार्यक्रमा मध्ये त्हातात तलवार देऊन फोटो काढण्यात आला होता ती तलवार भगवान उर्फ भागवत श्रीकृष्ण खांडे रा. पिंपळगाव मंजरा यांचे असल्याचे सांगीतल्याने व सदर तलवार बाबत् शोध घेऊन कायदेशीर कार्यवाही बाबत मला सांगीतल्याने मी व सोबत पोहेक/२४७ मोहन क्षीरसागर पोक/६८६ प्रदीप आशोक सुरवसे वा.चा. पोना/१०५१ राजु रुपचंद वंजारे असे सरकारी जिप क्रमांक चक-२३/ऋ९०२ मध्ये पोनि सो. आदेशाने बीड येथुन निघुन मौजे पिंपळगाव मंजरा येथे दोन पंचा सह भगवान उर्फ भागवत श्रीकृष्ण खांडे याचे रहाते घरी ची घरझडती घेणे कामी गेलो सदर ठिकाणी पिंपळगाव माजरा येथे जावुन गावातील भगवान उर्फ भागवत श्रीकृष्ण खांडे असे सांगीतले त्यास पंचा समक्ष घर झडती घेण्याचा उद्देश कळवुन व आम्ही व पंचानी आपआपली अंगझडती त्याचे घराची पाहणी व झडती घेतली असता त्याचे घरातील समोर खोलीचे स्लबचे खालील सिमेंट माळ्यावर वरील घरगुती सामाना खाली खालील वर्णनाची व किंमती ची एक धारदार लोंखडी तलवार मिळुन आली तीचे वर्णन खालील प्रमाणे. एक मुठी सह लांबी ८० से.मी.पाते ३ से.मी. तलवार लाल पांढरे व चॉकलेटी

◆ पान ४ वरून पुढे...

कपड्याचे मॅन मध्ये असलेली लोखंडी तलवार जिची धारदार असलेली व समोर टोकदार असलेली व समोरील बाजुचे पाते रुंदीचे तलवार पाते ची लांबी ६३ से.मी. एका बाजुस मुठ असलेली जुनी वापरती वरील वर्णनाची व किंमती तलवार मिळुन आल्याने तिचा दोन पंचा समक्ष जागीच पंचनामा करुन त्यावर आमचे व पंचाचे सहीच्या चिठ्या लावुन जप्त करुन ताब्यात घेतले. सदर चा पंचनामा लाईटच्या तरी भगवाना उर्फ भागवत श्रीकृष्ण खांडे पिंपळगाव माजरा याने विनापरवाना बेकायदेशिर रित्या घातकशस्त्र धारदार तलवार बाळगली म्हणून त्याच्या विरुद्ध आर्म एक्ट चे कलम ४/२५ व मुंबई पोलीस अधिनियम कलम १३५ नुसार गुन्हा दाखल करण्यात आला व मा न्यायालयात आरोपीस अटक करून दोषारोप पत्र दाखल करण्यात आले. त्यानंतर सदर प्रकरनात मा.न्यायालयात सरकार पक्षातर्फे एकून पाच साक्षीदार तपासण्यात आले .आरोपीचे वकील ॲड. योगेश टेकाडे यांनी घेतलेला बचाव व केलेला युक्तिवाद ग्राह्य धरून मा.न्यायाधीश अल्का भास्कर निवारे मॅडम यांनी आरोपीची निर्दोष मुक्तता केली.आरोपी भागवत खांडे तर्फे ॲड .योगेश टेकाडे यांनी काम पाहिले त्यांना ॲड.वैभव होळकर यांनी सहकार्य केले..

## 140 कोटींचे...

असे एकूण १४० कोटी रुपयांचे ६० फुट रुंदीचे सिमेंट रस्ते व नाल्यांची कामे करण्यात आली. मात्र या कामांदरम्यान महावितरणचे विजेचे खांब व रोहित्र स्थलांतरित करण्यासाठी निधीची तरतूद न झाल्याने ते रस्त्यांच्या मध्यभागीच राहिले. परिणामी वाहतुकीस अडथळा निर्माण होऊन अपघाताचा धोका वाढत आहे. गरपालिका व महावितरण एकमेकांवर जबाबदारी ढकलत असताना नागरिक मात्र जीव मुठीत घेऊन प्रवास करत आहेत. विशेषतः नगरनाका ते कृषी कॉलनी मार्गावर, तुळजाई चौक व एसबीआय बँकेजवळील रोहित्र गंभीर धोक्याचे कारण बनले आहेत. उघडी उपकरणे अपघातास आमंत्रण: यशवंतराव चव्हाण नाट्यगृह रोड, राजीव गांधी चौक, बार्शी नाका, केएसके महाविद्यालय, सुभाष रोड, जुने एसपी कार्यालय, कंकालेश्वर मंदिर व साठे चौक या भागांत जमिनीलगत असलेली उघडी उपकरणे, मोडकळीस आलेली रोहित्रे व फ्युज बॉक्स नागरिक व जनावरांच्या जीविताला सतत धोका निर्माण करीत आहेत.

Daily Marathwada Patra Owner, Printer, published and Editor Dattatray Sakharam Narnale has Printed in Gugladevi, Printers Subhash Road, Malives, Kabad Galli, Beed ( Rural) City, Beed Beed 431122 (Maharashtra). Office of Dainik Marathwada Patra Subhash road, Malives, Kabad Galli, Beed Tq- Beed Dist- Beed pin 431122 (Maharashtra) Mo. 9822152955, E-mail- dailymarathwadapatra2021@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com
हे पत्र प्रकाशक मुद्रक व मालक दत्तात्रय सखाराम नरनाळे यांनी गुगळादेवी प्रिंटर्स, सुभाष रोड, माळीवेस, कबाड गल्ली, बीड, ता.जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे छापून कार्यालय दैनिक मराठवाडा पत्र सुभाष रोड, माळीवेस, कबाडगल्ली, बीड ता. जि. बीड - ४३११२२ (महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. मोबा. ९८२२१५२९५५ संपादक - दत्तात्रय सखाराम नरनाळे, E-mail-marathwadapatra@gmail.com, epaper: https://marathwadapatra.com, Eportal-https://marathwadapatra.com

## थोडक्यात...

### जयहिंद लोकचळवळ युवा प्रशिक्षण शिबिर : सुदृढ समाजनिर्मितीसाठी खरी ताकद म्हणजे युवाशक्ती – आ. सत्यजीत तांबे




बीड । प्रतिनिधी

युवकांच्या सहभागातूनच सुदृढ समाजव्यवस्थेची पायाभरणी होऊ शकते. खरी ताकद युवाशक्तीच आहे, असे प्रतिपादन नाशिक पदवीधर आमदार व जयहिंद लोकचळवळचे मार्गदर्शक आ. सत्यजीत तांबे यांनी केले. बीड येथील सौभाग्य लॉन्स येथे पार पडलेल्या जयहिंद लोकचळवळ मराठवाडा विभागीय युवा प्रशिक्षण शिबिराच्या समारोपप्रसंगी ते बोलत होते. या वेळी आ. मनोज कायंदे, ॲड. सुहास अहिरे, प्रदेश कार्यकारिणी सदस्य रमेश सानप, डॉ. भूषण बदाने, सुमित भोसले, ईश्वर तांबे, संभाजी जाधव, जिल्हाध्यक्ष श्री. नाईकवडे यांच्यासह विविध मान्यवर उपस्थित होते. दोन दिवस चाललेल्या या शिबिरात ग्रामीण भागातील अडचणी व संधी, शिक्षण, आरोग्य, शाश्वत शेती, पर्यावरण संवर्धन, स्थानिक रोजगार निर्मिती व गाव-शहर विकास यावर सखोल चर्चा झाली. युवकांनी केवळ प्रश्न न मांडता ठोस कृती आराखडे तयार करून त्यांची अंमलबजावणी कशी करावी यावरही विचारमंथन केले. शिबिरात वामनदादा कर्डक लिखित माणसा तुझे मी हे प्रेरणागीत आनंद कुलकर्णी यांनी सादर केले. तसेच तरुण कलावंत रविकुमार धुताडमाल व त्यांच्या टीमने मित्र – सुदृढ समाज व्यवस्थेचा दुवा या विषयावर प्रभावी पथनाट्य सादर केले. या शिबिराला छत्रपती संभाजीनगर, बीड, जालना, हिंगोली, लातूर, नांदेड, धाराशिव व परभणी जिल्ह्यांतील युवकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. कार्यक्रम यशस्वी होण्यासाठी प्रदेश कार्यकरणी सदस्य रमेश सानप यांनी आयोजनाची जबाबदारी समर्थपणे पार पाडली. प्रस्तावना संभाजी जाधव व जिल्हा अध्यक्ष श्रीकृष्ण नाईकवडे यांनी केले तर आभारप्रदर्शन सुनील काळे व विष्णू मस्के यांनी केले. ॲड. गणेश करांडे, अक्षय डोंगरे, शामसुंदर जाधव, प्रजोल गायकवाड, शुभम खाडे, शिवराज कंटाळे, अभिषेक नगरगोजे, कृष्णा सानप, पवन बांगर आदी कार्यकर्त्यांनी परिश्रम घेतले.

### हिंदी भाषा रोजगार की भाषा हैं : प्रा.जयंत साठे

**सौ.के.एस.के.महाविद्यालयात हिंदी सप्ताह साजरा**



बीड । प्रतिनिधी

सौ.केशरबाई सोनाजीराव क्षीरसागर उर्फ काकू कला,विज्ञान व वाणिज्य महाविद्यालयामध्ये हिंदी विभागाच्या वतीने हिंदी सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते.सप्ताहाच्या समारोह प्रसंगी मुख्यकार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. या वेळी प्रमुख वक्ते प्रा.जयंत साठे यांनी विचार मांडताना म्हणाले की, हिंदी भाषा जगामध्ये बोलली जाणारी व शिकली जाणारी प्रमुख भाषा आहे.हिंदी भाषेचे शब्द भांडार प्रचंड असून तिच्यामध्ये माधुर्य आहे. हिंदी भाषा ज्ञान भाषा असून ती रोजगार देण्यासाठी सक्षम भाषा आहे. त्यामुळेच हिंदी भारतदेशाची राष्ट्रभाषा आहे. ही भाषा संपूर्ण भारतदेशामध्ये बोलली आणि शिकली जाणारी भाषा आहे. तिचे ज्ञान भांडार विस्तीर्ण असून देशामध्ये प्रत्येक क्षेत्रात रोजगाराच्या संधी उपलब्ध आहेत. या कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.शिवानंद क्षीरसागर हे होते.त्यांनी आपल्या अध्यक्षीय भाषणात सांगीतले की, भाषेचे महत्व समजावून सांगताना हिंदी भाषा देशाची एकता व अखंडता जपून ठेवते असे प्रतिपादन केले. आज इलेक्ट्रॉनिक्स मेडियामध्ये व सोशल मेडियामध्ये विविध पैलू उपलब्ध असून त्याचा नव्या पिढीने जाणीव पूर्वक वापर करणे काळाची गरज आहे. इंटरनेटच्या मायाजाळामध्ये सकारात्मक आणि उपयोगी माध्यमे शोधून त्याचा अवलंब विद्यार्थ्यांनी करायला हवा. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयाचे उपप्राचार्य डॉ. नारायण काकडे, पर्यवेक्षक जालिंदर कोळेकर आदी उपस्थित होते. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील डॉ.राहूल सोनवणे आदीसह शिक्षक व शिक्षकेत्तर कर्मचारी व विद्यार्थी उपस्थित होते.

### श्री तुळजाभवानी खासबाग देवी मंदिर येथे होणार मोठ्या उत्साहात घटस्थापना

बीड । प्रतिनिधी

बीड शहराचे ग्रामदैवत असलेल्या तुळजाभवानी मंदिर येथे प्रति वर्षाप्रमाणे मोठ्या उत्साहात नवरात्रोत्सवाची तयारी चालू आहे भक्ताच्या हाकेला धावून येणारी अशी देवीची ख्याती असलेली आई तुळजाभवानी खासबाग देवी विश्वस्त मंडळाच्या वतीने नवरात्र निमित्त जयत तयारी अंतिम टप्प्यात आलेली आहे. यावेळी देवी भक्ताच्या दर्शनाचा सुखद परवा असावा या हेतूने तयारी चालू आहे. त्यासाठी प्रशासनाच्या वतीने रोड तयार करण्याची सुरुवात केली आहे. तसेच विश्वस्त मंडळाच्या वतीने संपूर्ण सभागृहांमध्ये बॅरॅकेट्स संपूर्ण मंदिर परिसर सीसीटीव्हीच्या निगराणी खाली आहे. तसेच तुळजापूर प्रमाणेच घटस्थापना ते विजयादशमी व कोजागिरी पौर्णिमेपर्यंत विधिवत कार्यक्रम होणार आहेत. नवरात्र महोत्सव २०२५ मुख्य घटस्थापनेचा कार्यक्रम सकाळी साडेपाच वाजता सामूहिक देवी भक्तांचा त्यासोबतच विश्वस्त मंडळाचे अध्यक्ष दिनकरराव कदम यांच्या हस्ते देवीचा महा अभिषेक होऊन दररोजचे धार्मिक कार्यक्रम सकाळी ठीक पावणेसहा वाजता देवीची आरती रात्री सात वाजता आईसाहेबांचा पालखी छबीना मिरवणूक व त्यानंतर आराध्याच्या गाण्याचा कार्यक्रम होईल. मंगळवारी आदर्श माळ दुसरी दिनांक २३ सप्टेंबर रोजी आदर्श नगर अध्यात्मिक स्वामी समर्थ केंद्र यांच्यामार्फत ५०१ महिलांचा सामूहिक सप्तशतीचा पाठ होणार आहे.

# शेवटच्या श्वासापर्यंत शेतकऱ्यांसाठी लढत राहणार: जलनायक मयंक गांधी

## शेतकऱ्यांच्या विविध मागण्यांचे प्रशासनाला निवेदन ; शेकडोंची उपस्थिती

परळी वै. । प्रतिनिधी

तालुक्यातील अनेक गावात अतिवृष्टीमुळे अतोनात नुकसान झाले आहे. ऐन सणासुदीच्या दिवसांत अस्मानी संकट ओढवल्याने शेतकरी हवालदिल झाले आहेत. अगोदरच तोट्याची शेती आणि त्यात होत्याचे नव्हते झाले आहे. पाण्याने शेतकऱ्यांची पिके गेली, वाहत्या पाण्यामुळे शेतातील मातीही गेली तर काही ठिकाणी शेतात दगड गोटे येऊन बसले आहेत. या सर्व नैसर्गिक आपत्तीचे बांधावर जाऊन वस्तुनिष्ठ पंचनामे करून त्यांना तत्काळ मदत करावी अशी मागणी ग्लोबल विकास ट्रस्टचे संस्थापक अध्यक्ष जलनायक मयंक गांधी यांनी



तहसीलदार, परळी यांना दिलेल्या निवेदनातून केली आहे. त्याचबरोबर उद्या बीडचे जिल्हाधिकारी आणि परवा राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची शेतकऱ्यांना मदत करण्याच्या अनुषंगाने भेट घेणार आहे. शेतकऱ्यांचे प्रश्न ऐकल्यानंतर ते जगतात कसे? असा मला प्रश्न पडला, माझी झोपच उडाली असून मी शेवटच्या श्वासापर्यंत शेतकऱ्यांसाठी लढत राहणार असल्याचे जलनायक मयंक गांधी यांनी म्हटले आहे.

सर्व शेतकऱ्यांना एकत्र घेऊन परळीचे तहसीलदार यांना विविध मागण्यांचे निवेदन देण्यात आले. ज्यामध्ये १) प्रत्यक्ष नुकसानीचे वस्तुनिष्ठ पंचनामे करण्यात यावेत त्यांच्या नुकसानी नुसार १००% मदत करण्यात यावी. २)दिनांक १५/०९/२०२५ रोजी झालेल्या आतिवृष्टी ग्रस्त शेतकऱ्यांना सरसकट हेक्टरी ५० हजार रुपये मदत करण्यात यावी. ३) पशुधनाचे तसेच इतर संसाधनाचे त्यामध्ये, विहीर, बोर पाईप लाईन, ठिबक, किंवा इतर तत्सम जीवितहानीचे सर्वे करून बाधित शेतकऱ्यांना १००% मदत करण्यात यावी. ४) गावाला व शेताला जोडणारे रस्ते, वीज खंडित झाले असून त्यांचे सर्वे करून तात्काळ सुरळीत करून देण्यात यावे. ५)पाण्याने वाहून गेलेल्या जमिनीचे पंचनामे करून शासनाने शेतकऱ्यांना मदत दिली तरी त्या जमिनीची पोटखराब क्षेत्र म्हणून ७/१२ वर नोंद करण्यात येऊ नये. असे झाल्यास त्या शेतकऱ्यांना मिळणारे पुढील सर्व लाभ बंद होतील असे दिलेल्या निवेदनात म्हटले आहे. शेतकऱ्यांच्या वतीने देण्यात आलेले पाच प्रमुख मागण्यांचे निवेदन तहसीलदार व्यंकटेश मुंडे यांनी स्वीकारले. यावेळी शेकडो शेतकऱ्यांची उपस्थिती होती. उपस्थितांनी जय जवान, जय किसान भारत माता की जय अशा घोषणा दिल्या.

### बुधवारी मुख्यमंत्र्यांना भेटणार

**अतिवृष्टीने तर शेतकऱ्यांचे अतोनात नुकसान केले आहेच. नैसर्गिक आपत्तीबरोबरच अनेक समस्या आहेत. संकटाच्या काळात त्याच्या पाठीशी कोणीच उभे टाकत नाही. परळी वैजनाथ तालुक्यातील शेतकऱ्यांच्या विनंतीवरून त्यांच्या सर्व समस्या सोडवण्यासाठी मी सर्वांना सोबत घेऊन पुढील काळात संघर्ष करणार आहे. आज प्रशासनाकडे ज्या मागण्या केल्या आहेत त्या मागण्या आणि इतरही काही प्रश्नांची सोडवणूक करून घेण्यासाठी मी बुधवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची मुंबईमध्ये भेट घेणार असल्याचे मयंक गांधी यांनी उपस्थितांना म्हटले आहे.**

## बीड जिल्ह्यात डॉक्टरांकडून गोरगरिबांची लूट ; प्रशासनाकडून कारवाईची मागणी : शेख एहतेशामुद्दीन

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यात खाजगी डॉक्टरांकडून गोरगरिब जनतेची आर्थिक पिळवणूक सुरू असल्याचा आरोप काँग्रेस (आय) पक्षाचे शहर उपाध्यक्ष शेख एहतेशामुद्दीन यांनी केला आहे. रुग्णसेवेच्या नावाखाली गरिबांकडून अवास्तव दराने फी आकारली जात असून, किरकोळ आजारांसाठीही हजारोंच्या बिलांची वसुली होत असल्याचा त्यांनी आरोप केला आहे.

शेख एहतेशामुद्दीन यांनी म्हटले की, जिल्ह्यातील अनेक डॉक्टर स्वतःच्या



मेडिकल स्टोअर्सद्वारे औषधांना बाजारभावापेक्षा जास्त दर लावून रुग्णांची आर्थिक लूट करत आहेत. त्यांनी पुढे सांगितले की, ओपीडी फी, एक्स-रे, सोनोग्राफी, सिटी स्कॅन, आयसीयू सुविधा तसेच शस्त्रक्रियांसाठी ठराविक आणि पारदर्शक दर लागू करणं गरजेचं आहे. परंतु सध्याची परिस्थिती पाहता, सामान्य माणसाला खाजगी रुग्णालयांचा खर्च परवडणारा राहिलेला नाही. शेख एहतेशामुद्दीन यांनी महाराष्ट्राचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री अजित पवार, आरोग्यमंत्री डॉ. तनाजी सावंत आणि बीड जिल्ह्याचे पालकमंत्री यांच्याकडे मागणी केली आहे की, अशा प्रकारे रुग्णांची लूट करणार्या डॉक्टरांवर कठोर कारवाई करण्यात यावी. गरज भासल्यास संबंधित डॉक्टरांचा परवाना रद्द करण्याची शिफारस देखील त्यांनी केली आहे.

डॉक्टर हे देवाचे दुसरे रूप मानले जाते, पण आजच्या व्यापारीकरणाच्या युगात काही डॉक्टरांनी हा दर्जा गमावला आहे, अशी खंतही त्यांनी व्यक्त केली.

बीड जिल्ह्यातील आरोग्य सेवांमध्ये पारदर्शकता आणि जबाबदारी यासाठी प्रशासनाने लवकरात लवकर ठोस पावले उचलावीत, अन्यथा लोकशाही मार्गाने आंदोलन छेडू असा इशारा शेख एहतेशामुद्दीन यांनी पत्रकाद्वारे दिला आहे.

## माजी मंत्री क्षीरसागर यांच्या मोठ्या भगिनी श्रीमती पुष्पाताई पांगारकर यांचे निधन

बीड । प्रतिनिधी

माजी मंत्री जयदत्त क्षीरसागर यांच्या मोठ्या भगिनी श्रीमती पुष्पाताई श्रीधरराव पांगारकर यांचे सोमवार दि.२२ रोजी प्रदीर्घ आजाराने दुःखद निधन झाले. त्या ७९



वर्षाच्या होत्या. माजी नगरसेवक सुनिल पांगारकर आणि डॉ.गणेश पांगारकर यांच्या मातोश्री श्रीमती पुष्पाताई श्रीधरराव पांगारकर या काही महिन्यांपासून आजारी होत्या. त्यांच्यावर बीड येथेच उपचार सुरू होते. सोमवार दि.२२ रोजी पहाटेच्या सुमारास त्यांची प्राणज्योत मालवली. त्यांच्या पश्चात दोन मुलं, पाच मुली, सुना नातवंडे, जावई असा मोठा परिवार आहे. त्यांच्यावर सोमवारी बार्शी रोडनजीक श्री भगवान बाबा प्रतिष्ठान जवळील अमरधाम येथे अंत्यसंस्कार करणयात आले. श्रीमती पुष्पाताई या स्व.केशरकाकू क्षीरसागर यांच्या बरोबरच, राजकीय. धार्मिक. सामाजिक आणि सांप्रदायिक कार्यक्रमात सहभागी असायच्या त्यांच्या निधनाने सर्वत्र हळहळ व्यक्त होत आहे.

## विविध कल्याणकारी उपक्रम, योजनांवर राष्ट्रीय पोस्टर डिझाईन स्पर्धा

मुंबई । प्रतिनिधी

देशवासीयांचे भविष्य घडविणाऱ्या विविध कल्याणकारी योजना, अभियान, उपक्रमांवर आधारित राष्ट्रीय पोस्टर डिझाईन स्पर्धा भरविण्यात येत असल्याची घोषणा राज्याचे सांस्कृतिक कार्य मंत्री ॲड.आशिष शेलार यांनी केली. या स्पर्धेत नव्या प्रतिभेच्या कलाकारांबरोबरच नामांकित कलाकारांनी भाग घ्यावा, असे आवाहन मंत्री ड. शेलार यांनी केले.



सांस्कृतिक कार्य विभाग आणि महाराष्ट्र चित्रपट, रंगभूमी आणि सांस्कृतिक विकास महामंडळाच्यावतीने राष्ट्रीय पोस्टर डिझाइन स्पर्धा आयोजित करण्यात आली आहे. या स्पर्धेची 'टर्न व्हिजन इनटू आर्ट : डिझाइन द पोस्टर, सेलिब्रेट द डिकेड' अशी थीम ठेवण्यात आली आहे. ही स्पर्धा सर्व नागरिकांसाठी खुली आहे. मेक इन इंडिया, डिजिटल इंडिया, स्वच्छ भारत अभियान, आत्मनिर्भर भारत, बेटी बचाओ, बेटी पढाओ, स्किल इंडिया, वेव्ह्ज समिट, वातावरण बदल, योगा आदी विषय या स्पर्धेसाठी ठेवण्यात आले आहेत.

स्पर्धकांना ए२ आकारातील पोस्टर पीडीएफ, जेपीईजी, पीएनजी (हाय-रेझोल्यूशन) मध्ये www.pmvision2art.com या संकेतस्थळावर ७ ऑक्टोबरपर्यंत अपलोड करायचे आहेत. स्पर्धेतील यशस्वी ७५ विजेत्यांना पारितोषिके, ट्रॉफी आणि प्रमाणपत्रे देऊन सन्मानित करण्यात येईल.

## वकील संरक्षण कायदा होईपर्यंत आ.सत्यजित दादा तांबे तुम्ही पाठपुरावा कराच

बीड । प्रतिनिधी

बीड जिल्ह्यामध्ये जय हिंद लोक चळवळ या संघटनेचे अध्यक्ष आमदार सत्यजित तांबे यांनी बीडमध्ये युवा प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते या शिबिराचे समारोप करण्यासाठी आमदार सत्यजित तांबे व आमदार मनोज कायदे हे सौभाग्य मंगल कार्यालय येथे आले होते त्यावेळी ड. गणेश करांडे यांनी आमदार सत्यजित तांबे साहेब यांना आठवण करून दिली की आपण आता झालेल्या अधिवेशनात वकील संरक्षण कायद्याविषयी ची मागणी केली ती मागणी सभागृहात लावून धरून त्या मागणीचा पाठपुरावा करून जोपर्यंत वकील संरक्षण कायदा हा बिल स्वरूपात बनत नाही तोपर्यंत आपण त्याचा पाठलाग करावा.



तसेच महाराष्ट्राचे मुख्यमंत्री हे स्वतः पेशाने वकील असून त्यांना वकिलांच्या सर्व अडचणी माहिती आहेत वकिलांना व पत्रकारांना संरक्षणाची गरज आहे परंतु यांच्या संरक्षणावर अभ्यासपूर्ण सभागृहात कोणीही व्यक्त होत नाही. त्यामुळे आमदार सत्यजित तांबे तुम्ही स्वतः पदवीधरांचे नेतृत्व सभागृहात करत असून बीड जिल्हा वकील संघाच्या सदस्यामार्फत मी विनंती करतो की आपण सदरचे बिल सभागृहात लावून महाराष्ट्रातील तमाम वकिलांना संरक्षण देण्याकरिता सरकारकडून बिल पास करून घ्यावे. वकील संरक्षणाचा विषय कायम सभागृहात लावून धरावा. अशी विनंती ड. गणेश करांडे यांनी जय हिंद लोक चळवळीचे युवा प्रशिक्षण शिबिरा च्या समारोपनाच्या कार्यक्रमादरम्यान केली. यावेळी कार्यक्रमात आमदार सत्यजित तांबे, आमदार मनोज कायंदे, उपस्थित होते

# बीडमधील ऊसतोड कामगारांवरील 'कूस' लघुपटाला राज्यस्तरीय तिसरे पारितोषिक

## मंत्री नरहरी झिरवाळ, अभिनेते मकरंद अनासपुरे यांच्या हस्ते वितरण ; केजचे सुपुत्र, पत्रकार जीवराज चोले यांची निर्मिती

बीड । प्रतिनिधी

ऊसतोड मजूर महिलांचे आरोग्य व त्यांचे जगणे मांडणाऱ्या 'कूस' या लघुपटाला राज्यस्तरीय उत्कृष्ट लघुपट म्हणून तिसऱ्या क्रमांकाचे पारितोषिक मिळाले आहे. या लघुपटाची निर्मिती उचित मीडिया सर्व्हिसेसने केली असून, दिग्दर्शन व लेखन डॉ. ज्ञानेश्वर जाधवर यांनी केले आहे. राष्ट्रवादी काँग्रेस पार्टीच्या (अजित पवार) चित्रपट व सांस्कृतिक विभागातर्फे उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या वाढदिवसानिमित्त 'अजितपर्व' या लघुपट महोत्सवाचे आयोजन केले होते. या स्पर्धेत आगीनफूल लघुपटास प्रथम, तर चंद्रलेखा



लघुपटास द्वितीय पारितोषिक मिळाले. या स्पर्धेत राज्यभरातून ३५० पेक्षा अधिक लघुपटांनी सहभाग घेतला होता. त्यातून कूस लघुपटाने तिसरा क्रमांक मिळवला.

राज्याचे अन्न व औषध प्रशासन मंत्री नरहरी झिरवाळ व प्रसिद्ध अभिनेते मकरंद अनासपुरे यांच्या हस्ते 'कूस' लघुपटाच्या टीमला सन्मानित करण्यात आले. पुण्यातील पंडित जवाहरलाल नेहरू सांस्कृतिक केंद्रात आयोजित कार्यक्रमावेळी ज्येष्ठ अभिनेते अरुण नलावडे, चित्रपट महामंडळाचे मेघराज राजेभोसले, अभिनेत्री देविका दफ्तरदार, अभिनेते मिलिंद दास्ताने, सुनील गोडबोले, प्रभाकर मोरे, असित रेडीज, राष्ट्रवादीच्या नेत्या वैशाली नागवडे, रुपाली ठोंबरे, बाबा धुमाळ, संयोजक बाबासाहेब पाटील, नितीन धवणे पाटील, आदित्य संजयराव, अपेक्षा चव्हाण आदी उपस्थित होते. संदीप पाटील यांनी सूत्रसंचालन केले.

### 'कूस' कादंबरीवर आधारित लघुपट

**बीड जिल्ह्यातील ऊसतोड मजूर महिलांचे जगणे, त्यांच्या मासिक पाळीचा व आरोग्याचा प्रश्न, गर्भाशय पिशवी काढण्याचे प्रकार आणि त्यातून होणारी त्या स्त्रीची, कुटुंबाची कुचंबणा आदी गोष्टी या लघुपटातून मांडण्यात आल्या आहेत. डॉ. ज्ञानेश्वर जाधवर यांच्याच अनेक पुरस्कारप्राप्त 'कूस' या कादंबरीवर आधारित हा लघुपट असून, निर्माता व लेखक-दिग्दर्शक ऊसतोड मजूर कुटुंबातून आल्याने अतिशय वास्तविक रूपात तो मांडला गेला आहे. विठ्ठल काळे यांच्यासह अनुया कळसकर, वैशाली केंजळे, डॉ. सोनाली घाटणेकर, अनिल कांबळे व जीवराज चोले यांच्या यामध्ये प्रमुख भूमिका आहेत.**

दैनिक
# मराठवाडा पत्र
महाराष्ट्राचा बुलंद आवाज ● छत्रपती संभाजीनगर ● जालना ● बीड ● परभणी ● लातूर ● नांदेड ● धाराशिव ● हिंगोली ● अहिल्यानगर

● संपादक : दत्तात्रय सखाराम नरनाळे ● जिल्हा विशेष ● मंगळवार, दि. २३ सप्टेंबर २०२५ ● पान ४

## अतिवृष्टीने झालेल्या नुकसानीचे पंचनामे करुन बाधीतांना तातडीने मदत करणार: पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री पंकजा मुंडे

**बीड । प्रतिनिधी**

जिल्ह्यात मागील काही दिवसात अतिवृष्टीने झालेल्या शेती तसेच मालमत्ता नुकसानीचे तात्काळ पंचनामे करुन बाधीत शेतकरी आणि नागरिकांना तातडीने मदत करणार असल्याचे राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री श्रीमती पंकजा मुंडे यांनी सांगितले.

जिल्हाधिकारी कार्यालयात आयोजित जिल्ह्यात अतिवृष्टीने झालेल्या नुकसानीचा आढावा बैठकीत श्रीमती पंकजा मुंडे बोलत होत्या. या बैठकीस जिल्हाधिकारी विवेक जॉन्सन, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी जितिन रहेमान, निवासी उपजिल्हाधिकारी शिवकुमार स्वामी, तहसीलदार चंद्रकांत शेळके तसेच संबंधित कार्यालय प्रमुख यांच्यासह सर्व तहसीलदार दूरदृश्यप्रणालीद्वारे उपस्थित होते. यावेळी श्रीमती



पंकजा मुंडे म्हणाल्या की, अतिवृष्टीमुळे जिल्ह्यातील शेतपिकाचे तसेच मालमत्तेचे नुकसान झाले असून, शेतकरी व नागरिकांवर ओढवलेली ही संकटाची वेळ आहे. या संकटाच्या वेळी राज्य शासन त्यांच्या सोबत असुन, शक्य तेवढ्या लवकर नुकसानग्रस्तांना मदत करणार आहे. नुकसानग्रस्त शेतकऱ्यांचे बाधित क्षेत्र जनावरांचे नुकसान, सतेच मालमत्तेचे नुकसान या सर्व बाबींचा सविस्तर आढावा घेवून मदत कार्यात कोणताही अडथळा येवू न देता शासनाकडून शक्य तेवढी मदत मिळविण्यासाठी प्रयत्न करणार आहे. तसेच अतिवृष्टीने वाहून गेलेली जनावरे यांची कागदपत्रे पुरावा नसला, तरी त्याची शहानिशा करून, संबंधीतांना नुकसानीची मदत मिळेल यासाइी प्रयत्न ▶ उर्वरित पान २ वर

## बीड जिल्ह्यात ओला दुष्काळ जाहीर करावा : ॲड. सुरेशराव हात्ते

**बीड । प्रतिनिधी**

सध्या बीड जिल्ह्यात झालेल्या सततच्या पावसामुळे शेतकऱ्यांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. अनेक ठिकाणी पिके पाण्याखाली गेली असून कापूस, सोयाबीन, मूग, उडीद, भाजीपाला यांसारख्या पिकांचे अतोनात नुकसान झाले आहे. त्यामुळे शेतकऱ्यांवर आर्थिक संकट ओढावले आहे. परिणामी बीड जिल्ह्यात ओला दुष्काळ जाहीर करावा अशी मागणी माजी जिल्हा परिषद सदस्य तथा भारतीय



जनता पक्षाचे जिल्हा सरचिटणीस ॲड. सुरेशराव हात्ते यांनी आपल्या सरकारकडे केली आहे. शेतकरी संघटनांसह शेतकरी बांधवांनी राज्य सरकारकडे तात्काळ 'ओला दुष्काळ' जाहीर करण्याची मागणी केली आहे. तसेच नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना कोणत्याही प्रकारचा निकष किंवा अटी न लावता तात्काळ मदत जाहीर करावी, अशी सर्वसामान्य शेतकऱ्यांची अपेक्षा आहे. गेल्या काही दिवसांत झालेल्या मुसळधार पावसामुळे जिल्ह्यातील शेकडो गावांतील शेतकरी हवालदिल झाले आहेत. काही ▶ उर्वरित पान २ वर

## माजलगाव शहरात धाडसी चोरी

**माजलगाव । प्रतिनिधी**



शहरातील पूर्वा जिनींग, साईनगरी भागात राहणारे गोपाल सुभाष लड्डा हे बाहेरगावी गेले असता चोरांनी बाजार भावनुसार १५ लाख रु. चे दागिने २५ हजार नगदी व इतर एवज लांबवल्याची घटना दि. १८ रोजी उघडकीस आली. याप्रकरणी शहर पोलिसात गुन्हा दाखल झाला असून मागील दोन वर्षातील एकाही चोरी प्रकरणाचा तपास लागला नसताना वाढत्या चोरीच्या घटनानी नागरिकांत भीतीचे वातावरण आहे.शहर पोलिसात या प्रकरणी दाखल फिर्यादित गोपाल लड्डा वय ४५ हे आपल्या मुळगावी टाकरवण येथे दि. १६ सप्टेंबर रोजी गेले असता दि. १६ ते दि. १८ च्या दरम्यान ही घटना घडली. या धाडसी चोरी मध्ये लड्डा यांचे ३८ ग्राम वजनाच्या चार सोन्याच्या अंगठ्या, २० ग्राम वजनाच्या सोन्याचे ४ कानातले जोड,१० ग्राम चे सोन्याचे काफस, ३ ग्राम वजनाचे २ सोन्याचे नाकातले, ५ ग्रामची सोन्याची चैन,१५० ग्राम वजनाचे ३ पैंजण, ८५० ग्राम चे चांदीचे ताट, ५० ग्राम वजनाचा ▶ उर्वरित पान २ वर

## प्रचंड पावसाने शेतकऱ्यांची काढणीयोग्य पिके पाण्यात ; तत्काळ ओला दुष्काळ जाहीर करा- उल्हास गिराम

**बीड । प्रतिनिधी**

जिल्ह्यात परतीच्या पावसामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. गेल्या काही दिवसांपासून जिल्ह्यात सुरू असलेल्या मुसळधार पावसामुळे खरीप पिकांची अवस्था वाईट झाली होती त्यातच परतीच्या पावसामुळे शेतकऱ्यांची उभी व काढणीयोग्य पिके उध्वस्त झालेली असून शेतकऱ्यांना या या अस्मानी संकटातून बाहेर काढण्यासाठी महायुती सरकारने तात्काळ बीड जिल्ह्यात ओला दुष्काळ जाहीर करून शेतकऱ्यांना सरसकट मदत करावी, अशी मागणी शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे जिल्हा प्रमुख उल्हास गिराम यांनी केली आहे

आष्टी, पाटोदा, शिरूर, गेवराई तालुक्यातील जवळपास सर्वच महसूल मंडळात अतिवृष्टी झाली आहे मुख्य नद्या व उपनद्याना आलेल्या महापुरामुळे काही शेतकऱ्यांच्या जमिनीतील माती खरडून वाहून गेली आहे. शेतामध्ये पुराचे पाणी साचून राहिल्याने पिके व फळबागांचे खूप मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे अती पावसामुळे रस्त्यावरील पूल वाहून गेले आहेत असून घरांचीही मोठ्या प्रमाणात पडझड झालेली आहे त्यातच विजेचे खांब कोसळल्या मुळे लोकांना अंधारात रहावे लागत आहे अनेक शेतकऱ्यांच्या पशुधनाची ही जीवित हानी झाली आहे. अनेक शेतकऱ्याने शेती साठी कर्जे काढून बी बियाणे, खते, औषधी खरेदी केलेली होती पिके जोमात असतानाच या अस्मानी संकटाने हाता तोंडाशी आलेला घास हिरावून गेला आहे आधीच आर्थिक संकटात असलेला शेतकरी या संकटामुळे पुरता ▶ उर्वरित पान २ वर

## शेतातील पाणी काढून देण्यासाठी गेलेल्या शेतकऱ्याचा तुटलेल्या विद्युत तारेचा शॉक लागून मृत्यू



**आष्टी । प्रतिनिधी**

तालुक्यातील कऱ्हेवाडी येथील ४० वर्षीय शेतकरी शेतामध्ये पावसाचे साचलेले पाणी काढून देण्यासाठी गेला असता जमिनीवर तुटून पडलेल्या विद्युत तारेला स्पर्श झाल्याने मृत्यू झाल्याची घटना घडली. बाळासाहेब आश्रुबा सांगळे (वय४०) असे शेतकऱ्याचे नाव आहे. या दुर्दैवी घटनेने परिसरात ▶ उर्वरित पान २ वर

**● महावितरणच्या गलथान कारभारामुळे शेतकऱ्याचा मृत्यू**

**आमच्या गावातील विद्युत पुरवठा करण्यात येणारी लाईन खूप जुनी असून कमकुवत झाली आहे.हरिनारायण स्वामी विद्यालय शाळेपासून गेलेली तार धोकादायक असल्याने मागील ३ वर्षापासून पत्र व्यवहार करुनही महावितरण दखल घेत नाही.महावितरणच्या गलथान कारभारामुळे सर्वसामान्य शेतकऱ्यांचे बळी जात आहेत.आतातरी महावितरणाला जाग येते आवश्यक आहे. दरम्यान वीज वितरण कंपनीच्या गलथान कारभारामुळेच हा प्रकार घडला आहे. त्यामुळे वीज वितरण कंपनीने सदर कुटुंब गरीब असल्याने त्या कुटुंबास आर्थिक मदत द्यावी – बाळू सिताराम सांगळे ( उपसरपंच,कऱ्हेवाडी )**

## दिंडी वस्तीवर २२ नागरिक अडकडे, बाळराजे पवार यांचा तहसीलदार शेळके यांना फोन , बीड जिल्हयात चिंतेचे वातावरण

**गेवराई । प्रतिनिधी**

गेवराई मतदारसंघात असलेल्या नांदूर हवली व खामगावला पाण्याचा वेढा पडल्याने, जवळच असलेल्या दिंडे वस्तीवरची बावीस माणसे अडकली आहेत. एकजण झाडावर चढून बसल्याचा व्हिडीओ व्हायरल झाला असून, बीड जिल्ह्यात चिंतेचे वातावरण आहे. दरम्यान, बीड जिल्हा प्रशासन घटनास्थळी दाखल झाले असून, युवा नेते बाळराजे पवार यांनी बीडचे तहसीलदार चंद्रकांत शेळके



यांना तातडीने दूरध्वनीवरून फोन करून माहिती दिली. पवार यांनी घटनास्थळावरून आढावा घेऊन, कानडी पिंपळगाव येथील बेटा जवळच्या नागरिकांची माहिती घेतली. रात्री आठ वाजता बेटा जवळ थांबलेल्या उप विभागीय अधिकारी कविता जाधव यांच्याशी चर्चा केली. या बेटावर १३ नागरिक अडकून आहेत. गेवराई चे युवा नेते बाळराजे पवार हे सुद्धा नांदूर हवेली गावाच्या नव्या वस्तीवर ठाण मांडून होते. बाळराजे पवार यांनी तहसीलदार शेळके यांच्याशी दूरध्वनीवरून संपर्क साधून, गावात नागरीक अडकले आहेत. तातडीने मदत करा, अशी मागणी केली. दरम्यान, गावाला सुरक्षित बाहेर काढा, अशी मागणी होऊ लागली असून ; वस्तीवर अडकलेले लोक जीव मुठीत धरून बसलेत. त्यांना कसे ▶ उर्वरित पान २ वर

## राजकीय नेत्यांच्या वाढदिवसाला तलवार बाळगून ,तलवारीने केक कापल्याच्या आरोपातून भागवत खांडे ची निर्दोष मुक्तता : ॲड.योगेश टेकाडे

**बीड । प्रतिनिधी**



घटनेची हकीकत अशी की, मुकुंद सुर्यभान तांदळे वय पोहेक/११९४ ने.स्था.गु.शा.बीड यांनी सरकार तर्फे फिर्यादी होवुन फिर्याद दिली की, मी स्था.गु.शा. बीड येथे दहा महीण्या पासुन पोहेक म्हणुन नेमणुकीस आहे. आज दि.२७/०६/२०२० रोजी पोनि श्री, भारत राऊत सो. स्था. गु.शा.बीड यांनी आदेश दिला की, शिवसेना जिल्हा अध्यक्ष यांचे वाढदिवसाचे कार्यक्रमा मध्ये येथे त्यांचे घरा समोर झालेल्या कार्यक्रमात केक कापते वेळी तलवारीचा वापर केल्याचे फोटो व्हटसअप व्दारे व्हायरल झाल्याने व त्याबाबत कायदेशीर कार्यवाही करणे बाबत वरिष्ठांचे आदेश झाल्याने सदर फोटो ची ▶ उर्वरित पान २ वर

## 140 कोटींचे सिमेंट रस्ते पण धोकादायक रोहित्रे-खांब मधोमध अपघाताला निमंत्रण

### "सेल्फी विथ रोहित्र – हॅशटॅग अजितदादा" लक्ष्यवेधी आंदोलन : डॉ. गणेश ढवळे

**बीड । प्रतिनिधी**

मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त बीड येथे आलेले मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस व उपमुख्यमंत्री तथा पालकमंत्री अजित पवार यांच्या उपस्थितीत रेल्वे स्टेशन शुभारंभाचा कार्यक्रम पार पडला. या मार्गावरील धोकादायक रोहित्र प्रशासनाने फक्त मंडपाच्या कपड्याने झाकून ठेवले होते. त्यामुळे प्रशासनाची नामुष्की झाली आणि रोहित्रांचा प्रश्न पुन्हा ऐरणीवर आला.



या पार्श्वभूमीवर पालकमंत्री अजित पवार यांचे लक्ष वेधण्यासाठी आज (दि.२२ सप्टेंबर) सामाजिक कार्यकर्ते व मुख्य प्रचार प्रमुख, बीड जिल्हा माहिती अधिकार कार्यकर्ता महासंघ, डॉ. गणेश ढवळे यांच्या नेतृत्वाखाली सेल्फी विथ रोहित्र – हॅशटॅग अजितदादा हे लक्ष्यवेधी आंदोलन करण्यात आले. यावेळी जिल्हाधिकारी मार्फत मुख्यमंत्री व उपमुख्यमंत्री यांना निवेदन देण्यात आले. आंदोलनात रामनाथ खोड, अशोक येडे जिल्हाध्यक्ष (आप) ,रामधन जमाले जिल्हाध्यक्ष (इंटक), बाळासाहेब मोरे पाटील, प्रदेशाध्यक्ष शिवशक्ती भिमशक्ति विचारमंच , स्थानिक नागरिक, कार्यकर्ते व सखाराम बेंगडे सचिव (इंटक), शेख मुस्ताक,शेख मुबीन, नागरिक युवक मोठ्या संख्येने सहभागी झाले. १४० कोटींचे रस्ते, पण रोहित्रे जागेवरच ! : नगरोत्थान सुवर्ण जयंती योजनेतून टप्पा क्रमांक १ मध्ये ७० कोटी आणि टप्पा क्रमांक २ मध्ये ६९ कोटी ▶ उर्वरित पान २ वर

## थोडक्यात...

### आणीबाणी मानधन योजनेमध्ये सुधारणा अर्ज करण्यासाठी २४ नोव्हेंबरपर्यंत मुदत

**बीड । प्रतिनिधी**

आणीबाणीच्या काळात कारावास भोगला आहे, त्यांच्यासाठी मानधन योजनेमध्ये सुधारणा करण्यात येत आहे. त्यानुसार २४ नोव्हेंबरपर्यंत अर्ज सादर करण्याचे आवाहन करण्यात आले आहे. नवीन निर्णयानुसार, ज्या आणीबाणी धारकांनी यापूर्वी योजनेचा लाभ घेतलेला नाही, त्यांना नव्याने अर्ज सादर करण्यासाठी मुदत देण्यात आली आहे. अर्जदारांनी १५ सप्टेंबर २०१८ रोजीच्या शासन पूरक पत्रासोबत असलेल्या परिशिष्ट 'ब' मधील अर्ज जिल्हाधिकारी कार्यालयात सादर करणे आवश्यक आहे. तसेच आणीबाणीच्या काळात कारावास भोगलेली व्यक्ती २ जानेवारी २०१८ पूर्वी हयात नसेल, तर त्यांच्या पश्चात हयात असलेले पती किंवा पत्नी मानधनासाठी अर्ज दाखल करू शकतात. आणीबाणी मानधन योजनेसाठी अर्ज सादर करण्याची अंतिम मुदत २४ नोव्हेंबर, २०२५आहे. पात्र आणीबाणीधारक आणि त्यांचे हयात जोडीदार पती, पत्नी यांनी याची नोंद घ्यावी, असे आवाहन अपर जिल्हाधिकारी कृष्णराव धार्मिक यांनी केले आहे.

### भव्य मोफत रोग निदान व उपचार शिबीराचे उद्घाटन ; मा. ना. पंकजाताई मुंडे यांच्या शुभहस्ते संपन्न



**बीड । प्रतिनिधी**

देशाचे लोकप्रिय पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांचा वाढदिवस सेवा पंधरवाडा म्हणून सर्वत्र साजरा केला जात आहे. महान नेत्याच्या वाढदिवसाच्या अनुषंगाने बीड शहरात रविवार दिनांक २१ सप्टेंबर २०२५ रोजी भव्य मोफत रोग निदान व उपचार शिबीराचे राज्याच्या पर्यावरण व पशुसंवर्धन मंत्री लोकनेत्या पंकजाताई मुंडे यांच्या हस्ते या शिबिराचे उद्घाटन यांच्या शुभहस्ते संपन्न झाले. हे शिबिर सकाळी १० ते दुपारी ३ या वेळेत भव्य मोफत विविध आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले. याप्रसंगी मा. सुभाषचंद्र सारडा, जिल्हाध्यक्ष शंकर देशमुख, डॉ. आशिष भंडारी (मुख्य कार्यकारी अधिकारी, आनंदऋषीजी हॉस्पिटल) सर्जेराव तांदळे, इर्षाद भाई, सुवर्णा लांबरूड, संजय आंधळे, डॉ. आशिष भंडारी, डॉ रोहण धोतरे, डॉ. राजेश पारिख, गौतम खोटोड, जवाहर बोरा, मदन दूगड यांचेसह अनेक मान्यवर व भाजप पदाधिकारी उपस्थित होते. याप्रसंगी मा.ना. पंकजाताई मुंडे यांनी आनंदऋषीजी हॉस्पिटलचे आरोग्य विषय असणारी सेवा हे मानवतेचे कार्य असून बीड जिल्ह्यातील गोरगरीब रुग्णांना या हॉस्पिटलच्या माध्यमातून अल्प दरात चांगल्या आरोग्यसेवा मिळतील असा आशावाद व्यक्त केला. या शिबिरामध्ये गरजू रुग्णांनी लाभ घेतलेला असून या शिबिरा अंतर्गत सोनोग्राफी-१७, सिटीस्कॅन-१२, एक्स-रे-४३, आर्थोपेडिक पेशंट-५९, नेत्रचिकित्सा-६५, जनरल ओपीडी-२२, पॅथॉलॉजी टेस्ट- ४१ अशा एकूण २५९ रुग्णांनी लाभ घेतला. तसेच सध्या सुरू असलेल्या आनंदऋषीजी हॉस्पिटलच्या सेवेचा रुग्णांनी लाभ घ्यावा असे आवाहन विश्वस्त अशोक लोढा व गौतम खटोड यांनी केले आहे

### अतिवृष्टीमुळे पिंपळनेरसह ३९ गावांत मोठे नुकसान ;पंचनामे सुरू ; ओला दुष्काळ जाहीर करा

**पिंपळनेर । प्रतिनिधी**

बीड तालुक्यातील पिंपळनेरसह परिसरातील ३९ गावांमध्ये अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे २ हजार हेक्टर क्षेत्रातील पिकांचे नुकसान झाले. यामध्ये कापुस , तूर, बाजरी, सोयाबीन या पिकांसह फळबागांचे मोठे नुकसान झाले. प्रशासनाला नुकसान ग्रस्तांचे सरसकट मदत करण्याची मागणी शिवसेनेचे माजी जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते यांनी केली आहे . गेल्या आठवड्यापासून,पिंपळनेर सह परिसरातील अनेक गावात अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे पिके वाहुन गेली आहेत. बंधारे फुटले आहेत. रस्त्यांवरिल पुलांचे मोठे नुकसान झाले. अनेक शेतकऱ्यांच्या पाळीव जनावरे महापुरात वाहून गेल्याने झालेलं नुकसान शब्दात सांगणं कठीण असल्याचे शेतकरी सांगत आहेत . नुकत्याच झालेल्या अतिवृष्टीमुळे पिंपळनेर ,ईट, जवळा, आडगाव, कुक्कडगाव,ताडसोन्ना ,नाथापुर,वडगाव गुंधा सह बीड तालुक्यात मोठे नुकसान झाले. असून नागरिकांना मोठ्या अडचणींना सामोरं जावं लागत आहे. काही गावांतील घरांमध्ये पाणी शिरल्याने लोकांनी झाडांवर आणि उंच ठिकाणी आसरा घेतला. यंदा पावसाचे प्रमाण समाधानकारक असले तरी अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या शेतीचे अर्थकारण कोलमडून पडले आहे. त्यामुळे प्रशासनाने शेतकऱ्यांच्या नुकसानीचे सरसकट मदत करून ओला दुष्काळ जाहीर करावा,अशी मागणी शिवसेनेचे माजी जिल्हाप्रमुख परमेश्वर सातपुते सर यांनी केली आहे.

### बीड साठी मानधनावर कबड्डी मार्गदर्शकची आवश्यकता

**बीड । प्रतिनिधी**




जिल्हास्तर खेलो इंडिया कबड्डी केंद्र, बीड साठी मानधनावर कबड्डी मार्गदर्शक नियुक्ती बाबत जिल्हा क्रीडा अधिकारी, बीड अंतर्गत जिल्हास्तर खेलो इंडिया कबड्डी केंद्र, बीड साठी क्रीडा मार्गदर्शक म्हणून मानधन तत्वावर कर्मचारी नियुक्ती करणेसाठी दिनांक २७/०९/२०२५ पर्यंत कार्यालयीन वेळेत (सुट्टीचे दिवस वगळून) शैक्षणिक पात्रता व कबड्डी या खेळातील सर्वोत्कृष्ट कामगिरी केलेले प्राविण्य प्रमाणपत्राच्या सत्यप्रतिसह पुढील पात्रताधारकांकडून अर्ज मागविण्यात येत आहे. आपल्या अर्ज, शैक्षणिक पात्रता, इतर कागदपत्रे जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय, बीड येथे कार्यालयास दिनांक २७/०९/२०२५ पर्यंत कार्यालयीन वेळेत (सुट्टीचे दिवस वगळून) सादर करावेत. अधिक्षकच्या माहिती करिता क्रीडा मार्गदर्शक तथा कार्यासन प्रमुख श्री. रेवनानथ शेलार यांना (मो.नं. ९०७५४७६७९१) संपर्क साधावा